**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०७**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :२९/०२/२०१६

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र. ०७ गुरूवार दि.०३/०३/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता** अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशावये अहमदनगर महानगरपालिका.

**गुरूवार दिनांक ०३/०३/२०१६ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७३ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ व ९६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक (कर, दर प्रस्तावासह) मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ७३ गुरूवार दिनांक ०३/०३/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ व ९६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक (कर, दर प्रस्तावासह) मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग दिनांक १५/०२/२०१६
विषय :- सन २०१५-२०१६ चे सुधारीत व २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत.
संदर्भ :- १] अर्थ विभाग जा.क्र. ८५४ दिनांक ०६/०२/२०१६
२] नगरसचिव जा.क्र. ३५६ दिनांक ०६/०२/२०१६
३] अर्थ विभाग जा.क्र. ८७२ दिनांक ११/०२/२०१६
४] नगरसचिव जा.क्र. ३६५ दिनांक १५/०२/२०१६

सादर,

विनंती टिपणी सादर करणेत येते की, संदर्भ क्र.१ नुसार अर्थ विभागाकडून पाठविलेल्या प्रस्तावामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समितीकडे सादर करीत असल्याचे व कलम ९९ नुसार कर, दर वाढीस २० फेब्रुवारी पूर्वी मा. सर्वसाधारण सभेची मंजुरीची कालमर्यादा असल्याचे मा.स्थायी समितीला अवगत करणेसाठी नमुद करण्यात आले होते. तथापि संदर्भ क्र.२ नुसार मा.सभापती स्थायी समिती यांनी मा.स्थायी समिती व त्यानंतर मा.सर्वसाधारण सभेमध्ये अर्थसंकल्पाबाबत चर्चा व मंजुरीकरीता लागणार कालावधी विचारात घेता अंदाजपत्रक दि.२० फेब्रुवारी २०१६ पूर्वी मंजूर होणे शक्य वाटत नसल्याचे व अंदाजपत्रक मा.स्थायी समितीचे विचारार्थ न ठेवता मा.सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ व निर्णयार्थ ठेवणेत उचित वाटत असल्याचे तसेच याबाबतीत तपासून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे नमुद करण्यात आले होते.

त्यास्तव तपासून पाहिले असता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम ९५ अन्वये मा.आयुक्त यांनी दरवर्षी उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार करणे व कलम ९६ अन्वये मा.स्थायी समितीने मा.आयुक्तांचे अंदाज व प्रस्ताव विचारात घेणे व फेरफारसह अंदाजपत्रक तयार करणे अपेक्षीत आहे. तसेच कलम ९९ अन्वये करांचे दर निश्चित करणे यामध्ये दि.२० फेब्रुवारी २०१६ पूर्वी अंदाजपत्रक मंजुर होणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. मात्र कलम ९९ चा अभ्यास करता यामध्ये कलम १२७ अन्वये स्थित असलेल्या यादीतील करांचा प्रस्तावित अंदाजपत्रकात समोवश नसल्याचे सदर अंदाजपत्रक कलम १०० अन्वये दिनांक ३१ मार्च २०१६ पूर्वी मंजूर होणे अपेक्षित आहे.

त्यामुळे सदर अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आलेले कर, दर वाढ बाबतचे प्रस्तावास कलम ९९ लागू होत नाही. प्रस्तावीत केलेल्या अंदाजपत्रकात सन २०१५-२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रकाचाही समावेश आहे. त्यास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ व ९६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक (कर, दर प्रस्तावासह) मा.स्थायी समितीस विचारार्थ व निर्णयार्थ सविनय सादर करणेबाबत प्रस्तावीत करणेत येत आहे.

येणेप्रमाणे मुख्यलेखाधिकारी यांचा सादर असे.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा सहमती दर्शक सही
यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर प्र.नगरसचिव यांचा अभिप्राय की,मा.सभापती स्थायी समिती यांजकडेस आदेशार्थ सविनय सादर.

मा.सभापती स्थायी समिती यांचा अभिप्राय की, प्र.नगरसचिव अंदाजपत्रकावर विचार विनिमय व शिफारशी करणेकरिता दि. ३/३/२०१६रोजी सकाळी ११.३० वा. मा.स्थायी समिती सभा बोलविण्यात यावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--***--

**चर्चा :-**

मा.स्थायी समिती सभा गुरूवार दि.३/३/२०१६रोजी सकाळी ११.३०वाजता मा.स्थायी समिती सभागृह महानगरपालिका नविन प्रशासकिय इमारत,औरंगाबाद रोड येथे भरली असता मा,सभापती साहेब यांनी मा.आयुक्तसाहेब यांचे सभेमध्ये पुष्प गुच्छ देवून स्वागत केले व अंदाजपत्रकीय सभेस सुरूवात करणेस सुचित केले.

मा.आयुक्त साहेब :- मा.सभापती स्थायी समिती, स्थायी समिती सदस्य,नगरसेवक ,नगरसेविका , अधिकारी, पदाधिकरी कर्मचारी व उपस्थित पत्रकार बंधू यांचे सभेमध्ये स्वागत करतो.सन २०१५-२०१६ चे सुधारित व २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक प्रस्तावासह मा.स्थायी समिती सभापती मा.श्री. गणेश भोसले साहेब यांना सादर करत आहे.

मा.आयुक्त साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचा सन २०१६-१७ साठीचा अर्थसंकल्प सादर करतांना आपणा सर्वांसमोर अनेक आव्हाने आहेत. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत बळकटीकरणातून निधीची उपलब्धता व त्या निधीचा पर्याप्त व उचित विनियोग या अर्थसंकल्पातून प्रत्यक्षात आणण्याचा माझा मानस आहे.

यंदाचा सन २०१६-१७ चा अर्थसंकल्पात महसूली जमा रु. २७६.१४ कोटी व महसूली खर्च रु. २०१.८३ कोटी इतकी असुन भांडवली जमा रु. ४२७.३८ कोटी व भांडवली खर्च रु. ५०३.०१ कोटी इतकी आहे. सुरुवातीच्या शिलकेसह एकूण जमा रु. ७३३.८९ कोटी व एकूण खर्च रु. ७२५.५० कोटी इतकी आहे. सुरुवातीची शिल्लक रु. ८.७० कोटी तर अखेरची शिल्लक रु. ८.३८ कोटी इतकी आहे.

सध्या कार्यान्वित असलेल्या योजना पुर्णत्वास नेऊन नगरकरांना समर्पित करत असतांना मा. शासनाच्या अनेक योजनांना आगामी काळात नियोजनबद्ध आपणांस सुरुवात करायची आहे. सन २०१५-१६ मध्ये मा. शासनाने सुरु केलेली स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचा पहिला हप्ता २५०० वैयक्तिक लाभार्थी यांना वाटप करणारी अहमदनगर महानगरपालिका राज्यात पहिली महानगरपालिका ठरली आहे. ही यशाची कमान कायम ठेऊन सदर योजना पुर्णत्वास नेऊन राज्यामध्ये अहमदनगर महानगरपालिका प्रथम क्रमांकावर नेण्याचा मानस आहे. "हागणदारीमुक्त अहमदनगर" साठी स्वच्छ महाराष्ट्र अभियन अहमदनगर शहरात राबवताना "स्वच्छ अहमदनगर" संकल्पना साकार करण्यासाठी आपण सर्व कटीबद्ध राहणे अपेक्षीत आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून लवकरच ६२४ लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप करण्यांत येणार आहे. त्या बरोबरच महानगरपालिका सफाई कामगारांसाठीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेतून ११३ कर्मचारी यांना स्वत:च्या घराचा लाभ महानगरपालिकेकडून उपलब्ध होणार आहे.

शत प्रतिशत कचऱ्याचे संकलन ,वाहन व शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट या त्रिसुत्रीच्या यशस्वीतेसाठी बुरुडगाव स. नं. ३४ येथे ५० मे.टन क्षमतेचा मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प उभारुन प्रत्यक्षात या वर्षी खत निर्मितीची प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर सावेडी स.नं. २७९

येथे १०० मे.टन क्षमतेचा खत प्रकल्पाची उभारणी लवकरच पुर्णत्वास नेण्याचा मानस आहे. यासाठी उपलब्ध अत्याधुनिक व परिणामकारक साधन सामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे. सावेडी स. नं. २८९ येथे १ मे.टन क्षमतेचा बॅक्शन कंपोस्टींग प्रकल्प उभारणीचे काम पुर्णत्वास गेले आहे.

सन २०१६-१७ या वर्षात मा. केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालयामार्फत सुरु करण्यात आलेल्या अमृत अभियानाच्या (ATAL MISSION FOR REJUVENATION AND URBAN TRANSFORMATION) माध्यमातून साकारण्यात येणारे रु. १८० कोटीचे पाणी पुरवठा ,सौर उर्जा ,उद्यान विकास इ. प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे.या बरोबरच पुढील टप्यात मलनिसा:रण व जलनिसा:रण प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. ते करत असतानाच ई-गव्हर्नन्स, NMAM आधारीत उपर्जित द्विनोंद लेखा पद्धतीचा अवलंब, कुशल मनुष्यबळाची निर्मिती ,नगर नियोजन व शहरस्तरीय योजना, निधीचा पर्याप्त वापर, महानगरपलिका कर, दर व फी यांच्यात सुधारणा ,पत दर्जात सुधारणा,उर्जा व जल लेखा परिक्षण आणि स्वच्छ भारत अभियानही यशस्वीपणे राबविले जाणार आहे.

यातुन सोलर सिटी प्रोजेक्ट सारख्या अपारंपारीक उर्जा वापरास उद्युक्त करणाऱ्या योजना राबवून त्या माध्यमातून वीज वापरावर होणारा मोठ्या प्रमाणावरील खर्च कमी होण्यास मदत होईल. यंदाच्या वर्षात हुडको C.S.R. फंड नावीन्यपुर्ण प्रकल्पांतर्गत विळद जलशुद्धी केंद्रात वाया जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करणारा प्रकल्प पुर्णत्वास नेण्याचा संकल्प आहे. त्याबरोबरच सध्या प्रगती पथावर असलेली अहमदनगर शहर सुधारीत पाणी पुरवठा योजना यावर्षी पुर्ण करण्यात येणार आहे.

शिक्षणात केलेली गुंतवणूक ही सर्वोत्तम व कायम स्वरुपी किफायतशीर गुंतवणूक माणली जाते. त्या अनुषंगाने शैक्षणिक धोरण म्हणून महानगरपालिका अंतर्गत किमान एक शाळा मॉडेल स्कूल संकल्पनेवर विकसीत करण्याचा मानस आहे. त्यासोबतच महानगरपालिकेच्या वाचनालयाचा आधुनिकीकरणाचा मानस आहे.

महानगरपालिकेच्या डॉ. बाळासाहेब देशपांडे रुग्णालयास अद्यावत करत असताना रक्तपेढ़ीचे विस्तारीकरण व आधुनिकीकरण यावर भर दिला जाणार आहे.

महानगरपालिका कर्मचारी वर्गाचा आकृतीबंध व त्या अनुषंगाने पदाधिकारी व अधिकारी, कर्मचारी प्रशिक्षण या माध्यमातून कुशल, स्वच्छ ,गतिमान, पारदर्शी व उत्तरदायी प्रशासनाची निर्मिती दृष्टीपथात येणार आहे. त्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. त्यातून Service Level Bench Mark चे उद्दीष्ट गाठणे शक्य होणार आहे. महानगरपालिकेचे मुख्यालय तसेच चार प्रभाग कार्यालयामध्ये Information Kiosk Center, Customer Facilitation Center कार्यान्वित करण्यात येणार आहे. तक्रार निवारणासाठी SMS अलर्ट सुविधा सुरु करण्यात आलेली आहे.

मा. राज्य शासनाच्या सेवा हमी कायद्या (Right to Service) अंतर्गत आपले सरकार या पोर्टलला महाऑनलाईन लि. चे तांत्रिक मदतीने अधिसूचित करण्यात आलेल्या १५ सेवा ऑनलाईन तत्वावर नागरिकांना उपलब्ध करुन देतांना आपल्यावरील जबाबदारीचे भान आपणा सर्वांना ठेवावे लागणार आहे. या माध्यमातुन आपणा सर्वांवर शासनाचे नियंत्रण प्रस्थापित होत असल्याने पुढील काळात आपल्या जबाबदारीमध्ये वाढ होणार आहे.

माहितीच्या या युगात माहितीचे सहज, सोपे व सुलभ उपलब्धीकरण तसेच माहिती अधिकाराच्या मूळ उद्दीष्टाचे यशस्वितेसाठी रेकॉर्ड रुम संगणकीकरण करण्यात येणार आहे.

ऐतिहासिक अहमदनगर शहराचे महत्त्व लक्षात घेऊन देशी व विदेशी पर्यटकांना याची माहिती व्हावी यासाठी पर्यटक मार्गदर्शक विकसीत करण्यात येणार आहे. त्यामुळे पर्यटकांचा ओढा वाढविण्यात यश येऊन रोजगार निर्मितीस चालना मिळणार आहे.

शहरातील जे नागरीक बेघर आहेत अशा नागरीकांना रात्री निवाऱ्याची सोय व्हावी यासाठी रात्र निवारा केंद्र उभारण्याचा मानस आहे.

नगर नियोजन व बळकट पायाभूत सुविधा याचे प्रारुप विकसीत करतांना मार्गदर्शक ठरु शकणारे मापक म्हणून किमान एक रस्ता हा मॉडेल रस्ता म्हणून विकसीत करण्याचे नियोजन आगामी वर्षात करणार आहोत. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या माध्यमातून शासन व मनपा सहकार्याने रु.६० कोटींची रस्ते, लाईट, गटार इत्यादी स्वरुपातील कामे आपण मार्गी लावली. तर याच महाभियानाच्या जिल्हास्तर योजनेतून आगामी वर्षात रु. ६ कोटीपर्यंतची रस्ते विकासाची कामे देखील होणार आहेत. नागरी दलीत वस्ती सुधार योजनेतून तसेच अल्पसंख्यांक बहूल क्षेत्र विकास निधीतून रस्ते,गटार यासारखी कामे होणार आहेत. प्राथमिक सोयीसुविधा विकास निधीतून रु. ४० कोटीपर्यंतची रस्ते उद्याने स्मशानभूमी विकास(नालेगाव व केडगाव) सीना नदीवरील पुल यासारखी कामे मार्गी लागणार आहेत.

नगर शहराच्या सांस्कृतिक वारशास साजेसं असे महानगरपालिकेच्या सर्व सोयींनी सुसज्ज असे वातानुकुलीत नाट्यगृह नगरकरांना उपलब्ध करुन नगर शहराच्या सांस्कृतिक वाटचालीस भरीव मदत होणार आहे. बुरुडगाव रोडवरील महानगरपालिकेच्या स्वतःच्या जागेवरील व्यापारी संकुल B.O.T. तत्वावर साकारण्यात आले आहे. त्याच धर्तीवर चितळेरोडवरील नेहरु मार्केटच्या जागेवर B.O.T. तत्वावर भाजी मंडईसह सुसज्ज असे शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारुन शहराचे सुशोभिकरणात भर घालत असतांना रोजगाराभिमुख शहराची वाटचाल करण्यावर भर देण्यात येणार आहे. नगर शहरातून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षार्थ्यांची अधिकारी म्हणून निवड व्हावी यासाठी अद्यावत स्पर्धा परीक्षा केंद्राची निर्मिती होणार आहे.

रस्ते सुशोभिकरण व चौक सुशोभिकरण करणेकामी शहरातील नामांकीत सामाजिक संस्था, उद्योजक, दानशूर व्यक्ती यांच्या सहयोगाने करण्याचा मनोदय आहे.

तसेच महानगरपालिकेने सुरु केलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान, हागणदारीमुक्त शहर, कचरा मुक्त शहर या सारख्या अभियानात नगरकरांचा सक्रीय सहभाग समावेशीत करुन सहयोगी प्रशासन राबविण्यात येणार आहे.

शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार (Right to Pee) महिला वर्गासाठी सार्वजनिक स्वच्छता गृहाची निर्मिती यावर्षी करण्यात येणार आहे.

नदी संवर्धन कार्यक्रमाच्या माध्यमातून सीना नदीच्या पुर्नजिवीकरण व संवर्धन , सुशोभिकरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

स्त्री पुरुष समानतेच्या या युगात स्त्री भ्रुण हत्या टाळून स्त्री जन्माचे स्वागत करण्यास प्रवृत्त करणाऱ्या बेटी बचाव (Save The Girl Child) अभियानास महानगरपालिकेने यशस्वीपणे सुरुवात केलेली आहे.

अर्थात हे सर्व यश महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, सदस्य व प्रशासकीय यंत्रणेच्या एकत्रित प्रयत्नांवरच अवलंबून आहे. गतिमान प्रगतीच्या या जगात विकासाचा अपेक्षित वेग आपणा सर्वांना गाठावा लागणार आहे. त्यातूनच आपणा सर्वांच्या हातून निरंतर नगरसेवा प्रत्यक्षात घडु शकेल आणि पुन्हा एकदा ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा असलेल्या अहमदनगर शहराचे

"स्वच्छ शहर, सुंदर शहर" या संकल्पनेस मूर्त स्वरुप प्राप्त होईल. त्याकरीता आपणा सर्वांची सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.धन्यवाद!

मा.सभापती साहेब :- आताच आयुक्तांनी मनोगत व्यक्त केले पण त्यांनी जे सुचविले आहे तसे करून दाखविले पाहिजे. काम केले पाहिजे. मी आता येताना कचरा कुंडी बाबत जे दृश्य पाहिले ते व्हिडीओ क्लीप करून आयुक्तांना दाखवली आहे.आयुक्तांनी चांगले काम केले आहे. ग्रीन सीटी करणे करीता शहरात वृक्षारोपन केले पाहिजे.छोटी झाडे लावल्यास ती तग धरणे अवघड असते.या करीता दहा बारा फुटाचे झाड आणले पाहिजे. स्वच्छ शहर व सुंदर शहर झाले पाहिजे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :-मा.आयुक्तांनी अंदाजपत्रक सादर केले. अंदाजपत्रक देण्यास एवढा उशीर का झाला.तुम्ही उशीरा आंदाजत्रक पाठवल्यामुळे पेपरमध्ये आमची बदनामी झाली.

मुख्यलेखाअधिकरी श्री.विसपुते :- कलम १२७ चा विचार करता कर दर वाढीसाठी २० फेब्रुवारी ही मर्यादा लागू आहे. तशी वाढ याअंदाजपत्रकात नाही. आधीच्या प्रस्तावात चुकीने दिनांक २० फेब्रुवारी पर्यत मंजूर व्हायला पाहीजे असे लिहीले होते.

मा.सभापती साहेब :- तुमच्या चुकीमुळे आमची बदनामी होते.

मा.आयुक्त साहेब :- अतिशय छोटया कारणामुळे संभ्रम निर्माण होतो. गैरसमज होतात. कर दर वाढ ही प्रक्रिया वेगळी आहे. दर करचे प्रस्ताव तयार झाले नाही. त्यासंबंधी महासभेमध्ये निर्णय होईल.कर दर हे प्रस्ताव अगोदरच सादर करावे लागतात. दरवर्षी असे असे होता कामा नये.अंदाजपत्रक प्रचलित दरानुसारच सादर करावे लागत. कर दराबाबत जर निर्णय झाला तर अंदाजपत्रकाला मंजूरी दयावी लागते.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव तयार करणेबाबत विभाग प्रमुख सांगतात कर्मचारी उपलब्ध नाही त्याला इलेक्शनचे काम आहे. तो बी.एल.ओ. आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- या अंदाजपत्रकात नगरसेवक निधी मध्ये तरतूद केली का ?

मुख्यलेखाअधिकारी श्री. विसपुते :- स्वेच्छा निधी ५.२ कोटी आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :-या निधी खाली ठेकेदार काम घेत नाही आम्ही आमच्या पैशांनीच वॉर्डातील काम करतो.

मा.श्री.अनिल बोरूडे :- बालिकाश्रम रोड जो झाला त्याचे ९०टक्के काम पुर्ण झाले पण तेथे स्ट्रीट लाईट का नाही टाकले.

इलेक्ट्रीक प्रमुख श्री. सातपुते :- ठेकेदार म्हटला दोन, तीन दिवसात काम चालू करतो.

मा.श्री. अनिल बोरूडे :- फुलारी पेट्रोलपंपाजवळ खडीकरण झालेले आहे. त्याचे डांबरीकरण का नाही झाले.

श्री. पारखे :- दोन, तीन दिवसात काम चालू होईल.

मा.श्री. अनिल बोरूडे :- स्ट्रीट लाईटसाठी पैसे आहेत ना. इंजिनिअर लोकांनी फॉलोअप का नाही केला. किती दिवसात काम होईल.

इलेक्ट्रीक प्रमुख श्री. सातपुते :- आपण पाठपुरावा केला ८ दिवसात काम चालू होईल.

मा.आयुक्त साहेब :- काम तात्काळ पुर्ण करायला सांगीतले. महाराष्ट्र नगरोत्थान योजनेचे पैसे शिल्लक आहे. आपण त्याला कालमर्यादा दिली आहे. त्या मुदतीत त्याने काम पुर्ण करावे. नाही तर पैसे परत जातील माझी भुमिका मी स्पष्ट मांडतो. मी मुदत दिली आहे. त्या मुदतीत काम झाले नाही. तर त्याच नाव काळया यादीत टाकायच.

श्रीमती छाया तिवारी :- अभ्यासाठी सभा तहकूब करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- दिनांक ९/३/२०१६ रोजी सकाळी ११.३०वा. सभा बोलवा.सन २०१६-१७ या वर्षाचे अंदाजपत्रक आपल्या महानगरपालिकेचे आयुक्त यांनी सादर केले आहे.अंदाजपत्रकाची माहिती दिली आहे.त्यावर चर्चा करण्यासाठी दिनांक ९/३/२०१६ रोजी सकळी ११.३०वा.सभा पुढे सुरू होईल.

स्वच्छ शहर, सुंदरनगर , आरोग्यदायी शहर करणेसाठी तुम्ही प्रयत्न करा. आम्हीही करू.

**दि.३/३/२०१६ रोजी तहकूब केलेली सभा दि. ९/३/२०१६ राजी सकाळी १२.०५वा.स्थायी समिती सभा अंदाजपत्रकाच्या विचारार्थ सुरू झाली.**

आज दि. ९/३/२०१६ राजी सकाळी १२.०५वा.स्थायी समिती सभा अंदाजपत्रकाच्या विचारार्थ सुरू झाली.

मा.सभापती साहेब :- दि.३/३/२०१६ रोजी तहकूब केलेली सभा सुरू करावी.

अर्थ विभाग श्री.लोंढे :- पान क्र.५ कर दर वाढ प्रस्ताव,पाणीपट्टी दरात वाढ करणे.पा.नं.७ सन २०१६-१७ मध्ये पाणीपट्टी दरवाढ,वार्षीक पाणीपट्टी मीटर प्रमाणे दरवाढी बाबत तपशील तक्त्याप्रमाणे मुख्यजलवाहीणी वरील कनेक्शन धारकाचे दरवाढ ब व क प्रमाणे प्रस्ताव व वरील प्रमाणे प्रस्तवित केलेले दरवाढी नुसार उत्पन्नाचा गोषवार पा.नं.८ वर आहे.पा.नं.९ वरील १ ते ३ मुद्दे विचारास्तव सादर तसेच फेरसादर पा.नं.१० व ११

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- सामान्य नागरीकांकरीता पाणीपट्टी मध्ये वाढ केली.तुम्ही रोज पाणी देता का?एक दिवसाआड पाणी येते.केडगांवमध्ये नळजोड करीता ५०% रक्कम तुम्ही घेतली व ५०% बिलात लावणार आहात.आणी परत तुम्ही दरवाढ करता हे कितपत योग्य आहे.सध्या नागरीकांवर बोजा टाकणे हे आवश्यक नाही.

मा.उपायुक्त(सा) श्री.चारठाणकर :- शासन निर्णय २०१० चा आहे.म.न.पा.च्या पाणीपुररवठा योजना स्वयंपुर्ण असाव्यात,आपला खर्च जास्त झाला आहे. सन २०१२-१३,२०१३-१४,२०१४-१५,मध्ये उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाला आहे.

मा.सभापती साहेब :- आमच्या सहका-यांनी सुचविले आहे की,दरवाढ करू नये. १० हजार ६८० अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत.

पाणी पुरवठा प्रमुख श्री.निकम :- अनाधिकृत नळ कनेक्शन चा शोध चालू असून अत्तापर्यत २२०० लोकांनी अनाधिकृत नळ कनेक्शनचे पैसे भरले आहेत.

मा.सभापती साहेब :- ८००० लोक अजून शिल्लक आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- कल्याणरोड परिसरात ४ ते ५ दिवसाआड पाणी देतो. तर लोक कसे पैसे वाढून देतील.

मा.सभापती साहेब :- पाणीपट्टी वाढवू नये. अनाधिकृत नळ कनेक्शन आणखी सापडू शकतील. पाणी आपण लोकांना रोज देत नाही.जेव्हा फेज टू चे पाणी सूरू होईल तेव्हा आपण दरवाढ केली तर ते योग्य राहील.जर आपण लोकांना एकाच वेळी पूर्ण दाबाने पाणी देवू तरच दरवाढ योग्य आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.निकम :- व्यावसायीक लोकांचा तरी विचार करावा.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- घरगुती नळ कनेक्शन साठी आहे तेवढीच पाणीपट्टी ठेवा.व्यावसायीक पाणीपट्टीचा दराचा आपण विचार करू.

मा.सभापती साहेब :- व्यावसायीक पाणीपट्टी दरवाढ राहू दया.खाजगी टॅकरचे किती घेतो मोठया टॅकरचे किती पैसे घेतात.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- घरगुती पाणीपट्टीचा दर सोडून बाकीचे दर प्रस्तावाप्रमाणे मंजूर करावेत.

मा.सभापती साहेब :- घरगुती पाणीपट्टी दर सोडून व्यावसायीक व इतर कारणांकरीताची पाणीपट्टी दर प्रस्तावा प्रमाणे करण्यात यावी.

प्रस्तावा क्रमांक २.

अर्थ विभाग श्री.लोंढे :- प्रस्ताव क्र.२ चे वाचन.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- हा कर कसा लागू करणार आहे.

मा.उपायुक्त(कर) श्री.बेहरे :- R.V.च्या २%अग्निशमन कर लागू करणार आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- मध्यंतरी च्या काळात मुंबई मध्ये अग्निशमन बाबत जी बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीमध्ये म.न.पा.चे अधिकारी गेले होते.त्या बैठकिमध्ये काय झाले.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- मा.शासन साडेतीन कोटी अनुदान देणार आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- अग्निशमन कर २ % प्रमाणे आपण लावणार आहात.या दोन टक्के प्रमाणे किती पैसे होतात.कोण सांगणार आहे.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभागास २ % प्रमाणे किती पैसे मिळणार ते सांगा

मा.श्री.श्रीपाद छिंदम :-तुम्ही फक्त प्रस्ताव सादर केला.संपूर्ण शहराच्या प्रॉपर्टीज ची R.V.किती आहे. २ % प्रमाणे किती कर जमा होईल हे तुम्ही पाहीले पाहिजे.

मा.सभापती साहेब :- हे बजेट आहे कि,पोरखेळ आहे.तुम्ही हे सगळे आधी पाहून ठेवायाला पाहीजे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- आपल्याला दरवर्षी घसारा सोडून घरपट्टी किती मिळते.

मा.उपायुक्तश्री. (कर) श्री.बेहरे :- एका वर्षाला अग्निशमन कराची R.V. च्या २ % आकारणी केली जाते.साधारण: साडे तीन कोटीच्या आसपास रक्कम मिळेल.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावामध्ये रक्कम दिसली पाहिजे ना.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- R.V. बजेटला लिहिलेली नसते.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- एकूण वार्षिक मागणी रूपये ३७ कोटी आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- अनुदान किती मिळते.

अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :- साडेतीन कोटी मिळणार आहे. पण मनपाला हिस्सा भरावा लागणार आहे.

मा.सभापती साहेब :- किती कर्मचारी आहेत.

अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :- ४० कर्मचारी आहेत.

मा.सभापती साहेब :- ४० पैकी किती कर्मचारी प्रशिक्षीत आहेत.

अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :- १२ कर्मचारी प्रशिक्षीत आहेत.

मा.सभापती साहेब :- हमाल, शिपाई,बिगारी असे कर्मचारी तेथे फायार फायटर मध्ये काम करतात. अग्निशमन म्हणजे शहराची सुरक्षीततेची जबाबदरी त्यांचेवर आहे.वारंवार सांगूनही तेथे प्रशिक्षीत कर्मचारी का भरत नाही.

मा.श्री.अनिल बोरूडे :-अग्निशमन विभागामध्ये लेंडकर नावाचे जे कर्मचारी आहेत.त्यांना चालतातरी येते का?

अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :- हो त्यांना व्यवस्थीत चालत येत नाही.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- बांधकाम व्यावसायीकांकडून तुम्ही पैसे भरून घेता ना.

अग्निशमन प्रमुख श्री. मिसाळ :- त्यांचेकडून २० ते २५ लाख रूपये वर्षाला मिळतात.

मा.सभापती साहेब :- प्रशिक्षीत लोक मानधनावर घ्या. लोकांच्या सुरक्षेची जबाबदारी तुमच्यावर आहे.तरतूद करून महिनाभारात ही प्रक्रीया करा.आपण काही देत नाही.आणी कारवाढ करायची हे योग्य नाही.

अर्थ विभाग श्री.लोंढे :- प्रस्ताव क्रमांक ३ चे वाचन केले.

आरोग्य अधिकारी डॉ.राजूरकर :- या प्रस्तावासोबत आरोग्य विभागाचे दोन विषय आहेत.

मा.उपायुक्त (कर) श्री.बेहरे :- कोणते प्रस्ताव आहेत ते सांगा.

आरोग्य अधिकारी डॉ.राजूरकर :- ४ नागरी आरोग्य केंद्र व आणखी ३ महानगरपालिकेचे दवाखाने आहेत तेथे रू.५ केसपेपर फी आपण आकारतो.तोफखाना,झेंडीगेट,मुकुंदनगर,हे महानगरपालिकेचे काही चांगले दवाखाने आहेत.जे चालत नाहीत ते बंद करण्यात यावे.दाणेडबरा दवाखाना अत्यंत दुरावस्थेत आहे.

मा.सभापती साहेब :- सावेडी, वैदूवाडी,बोल्हेगांव व इतर उपनगरामध्ये पुर्ण वेळ दवाखाना सूरू करण्यात यावा.

आरोग्य अधिकारी डॉ.राजूरकर :- त्या भागातील डॉक्टर व सिस्टर यांचे मार्फत आपण आधी दवाखाने चालवून त्यांच्या मार्फत आपणाला चांगला प्रतिसाद आला तर वेळ वाढवू.

मा.सभापती साहेब :- दोन तीन दिवसांपूर्वी मला कुष्ठरोगी भेटायला आले होते.काहीना हाताची बोटे नव्हती,त्यांची आवस्था फार दययनीय आहे.

आरोग्य अधिकारी डॉ.राजूरकर :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतीन कुष्ठपीडीत रूग्ण,अपंग रूग्ण, व मनोरूग्ण आर्थिक दृष्टया जर दुर्बल असतील तर त्याना दर महा १ हजार रूपये मासीक अनुदान देणे बाबत प्रस्ताव ठेवला आहे.

मा.सभापती साहेब :- त्या लोकांना योग्य ती मदत देण्यात यावी.

अर्थ विभाग श्री.लोंढे :- पान नं. ७८ चे वाचन अनु.क्र. ड सार्वजनीक शिक्षण

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या किती शाळा आहेत.व शिक्षक कीती आहे व विद्यार्थी संख्या किती आहे.

शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी श्रीमती पारचे :-महानगरपालिकेच्या १२शाळा आहेत.प्राथमीक शाळे करीता ४३शिक्षक आहेत.माध्यमिक शाळेचे ४शिक्षक असून ते मानधनावर आहे.व विद्यार्थी संख्या११३० आहे.

मा.सभापती साहेब :- गेल्या दहा वर्षा मध्ये आपल्या शाळेचा पट वाढण्याऐवजी कमी कमी होत चालला आहे.तुम्ही पट वाढण्यासाठी प्रयत्न करीत नाही का.शिक्षकांवर एवढा खर्च होतो. तुम्हाला काम न करता नुसता पगार दयायचा का.

शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी श्रीमती पारचे :- मी शिक्षण अधिकारी म्हणून नव्याने हजर झाली आहे.मी प्रमाणीक पणे पट वाढविण्याचा प्रयत्न करणार आहे.

मा.सभापती साहेब :- गरीब घरातील मुले हे महानगरपालिकेच्या शाळेत शिकतात.या गरीब घरातील मुलांचे पालक जागरूक नसतात. आपण मुलांना शाळेचे महत्व पटवून देवून ते दररोज हजर राहतील या करीता मोफत गणवेश,वहया,पुस्तके दया या सारख्या उपाययोजना करा जेणे करून विद्यार्थी शाळेत हजर राहतील.बुरूडगांव येथे मी राहतो त्या ठिकाणी पारधी समाजाची कुटुंबे आहेत.त्यांचे तेथे जावून त्यांच्या मुलांना शाळेचे महत्व पटवून देवून शाळेत येण्यासाठी प्रवृत्त करा.खर्च ३ कोटी ऐवजी ५ कोटी झाला तरी चालेल.पण कोणाचीही मुले शिक्षणापासून वंचीत रहाता कामा नाही.नगरमध्ये ४ ते ५ लाख लोकसंख्या असतांना महानगरपालिकेच्या १२ शाळा असून देखील पट फक्त ११३० आहे.यावर्षी शाळेतील विद्यार्थी संख्या वाढली पाहीजे या कडे लक्ष दया.

अर्थ विभाग श्री.लोंढे :- पान नं. १८ चे वाचन अनु.क्र. १ मधिल मुद्दा क्र.११ मोबाईल टॉवर.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- जमीन व ईमारीती वर असणा-या मोबाईल टॉवर चे सर्व्हेक्षण केले आहे का.त्यामध्ये अधिकृत मोबाईल टॉवर व अधिकृत मोबाईल टॉवर यांची संख्या किती आहे.

मा.उपायुक्त (कर)श्री. बेहेरे :- महानगरपालिका हद्दीमध्ये १५१ टॉवर आहेत.त्यामध्ये अनाधिकृत टॉवर ची संख्या कमी आहे. मा.सभापती साहेब :- उत्पन्न शुन्य आहे.मागच्या बजेट मध्ये किती तरतूद आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री.बेहेरे :- १.५० ते २ कोटी उत्पन्न अपेक्षीत आहे.

मा.सभापती साहेब :- १०० अनाधिकृत आहे.लोक अनाधिकृत पार्कीगचे पैसे घेतात.त्याचं आपल्याला उत्पन्न मिळत नाही.आपण पुण्यात जातो.तिथे गाडी पार्किग करतो त्यांना पैसे देतो अहमदनगर शहरात पार्किग ची व्यावस्था करून त्यापासून आपल्याला उत्पन्न मिळेल असे काहीतरी करा.भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून देण्यात यावी.एम.जी.रोड वर पार्किग केले तर आपल्याला उत्पन्न मीळू शकेल.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- घरपट्टी वसूली साठी तुम्ही काय प्रयत्न करता.

मा.सभापती साहेब :- पार्किग चे पैसे मिळत असतील तर तुम्हाला काय अडचण आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- असेही विनापरवाना ते जागा वापरतातच ना.

मा.सभापती साहेब :- नगररचना विभागाने ज्या ठिकाणी आपण पार्किग करू शकतो त्या दाखवाव्यात.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ब-याच ठिकाणी घर बांधून ५ वर्ष झाली आहेत तरी देखील आपण त्यांना घरपट्टी लागू झालेली नाही.नाव लावण्यासाठी कंप्लीशन सर्टीफिकेट बंधनकारक आहे.कंप्लीशनची अट लावू नका.तुम्ही सर्व्हेक्षण करून त्यात मार्ग काढा.जेणे करून १ ते १०० प्लॉट ला घरपट्टी का लावत नाही.मुळ मालकाच्या नावानेच नोंद का करता.जर त्यांनी प्लॉट विकत घेतले असतील त्यानी नाव लावले नाही तरी मुळ मालकाला घरपट्टी येत राहील.

मा.उपायुक्त (कर) श्री.बेहेरे:- आपण त्याला आकारणी करतो.मोकळया प्लॉटला आपण ताबडतोब घरपट्टी लावतो.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- मालमत्ता हस्तांतरण करणेसाठी कंप्लीशन ची अट लावू नये.

मा.सभापती साहेब :- ज्यांनी कंप्लीशन दिले त्यांना सुध्दा घरपट्टी नाही. ज्या दिवशी आपण कंप्लीशन देतो.त्या दिवसापासून घरपट्टी का लावत नाही.परत मोजणी करायला का जाता.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- मालमत्ता हस्तांतरणा बाबत तुम्ही काय करणार कंप्लीशन असल्याशिवाय तुम्ही हस्तांरण करीत नाही. मालमत्ता हस्तांतण करण्यासाठी कंप्लीशन ची अट कढून टाकण्यात यावी.मोकळया प्लॉटच्या ले आउटला मंजूरी देतांना त्या प्लॉटला घरपट्टी आकारावी कारण जेव्हा आपण बांधकाम परवानगी मागायला जातो तेव्हा त्या प्लॉटची नोंद झालेली नसते. हस्तांतरण करतांना आपण १% हस्तांतरण फि भरून घेतो.

मा.सभापती साहेब :- जी.आय. एस. सिस्टीम व्दारे घरपट्टी आकारणी करीता काम चालू आहे.ते लोक नागरींकांकडून पट्टी कमी करण्याच्या नावाखाली पैसे घेतात.तुमची घरपट्टी कमी करून देतो.असे सांगतात.असे होता कामा नये.

मा.उपायुक्त (कर) श्री.बेहेरे :- या करीता आपण क्रॉस चेकिंग करतो आहे.रो-हौसींग मधील घरे किंवा फलॅट सिस्टम मधील घरे एक सारखीच असतात व बांधकाम प्रकार सुध्दा सारखाच असतो.अशा नागरीकांच्या तक्रारी नुसार आपण प्रत्यक्ष पाहाणी करून घरपटटी कोणाला जास्त किंवा कमी लागली असेले तर त्याची शहानीशा करतो.

मा.सभापती साहेब :- हे लोक पैशाची मागणी करून भाडेकरी दाखवीत नाहीत.

मा.आयुक्त साहेब :- ओपन प्लॉट च्या बाबतीत रेखांकन मंजूर करतांना त्याची एक प्रत उपायुक्त(कर) व सहाय्यक मृल्यनिर्धारक करसंकलन विभागाला देणे बाबत दक्षता घेण्यात यावी.कर विभागास हि प्रत मिळाल्या नंतर सात दिवसांच्या आत त्याची रजिष्टर ला नोंद घेवून त्या प्लॉटला कर आकारणी झालीच पाहिजे.रेखांकन भू धारकाच्या पत्यावर सदर आकारणीचे बिल दिले जाणे आवश्यक आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- नगररचना विभागाने मंजूरी देताना तुम्ही त्याला रोडचे, लाईटचे पैसे भरायला लावता तसे हस्तांतरणचे पैसे भरायला लावा.

मा.आयुक्त साहेब :- प्राथमिक (तात्पुरती) मंजूरी मिळाली त्याची कॉपी व नकाशाची प्रत मालमत्ता विभागाला गेलीच पाहिजे. त्याची रजिष्टरला नोंद झालीच पाहिजे. भूखंड विक्री करतो ट्रान्सफर साठी अर्ज केले जातात. हस्तांतरणासाठी अर्ज करण ही तांत्रिक प्रक्रिया आहे. १० दिवसापर्यंत प्रकरण पेंडीग ठेवण्याच काही कारण नाही. ७/१२ ला नोंद लावली किंवा नाही हा प्रशासनाचा विषय नाही आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- सुची क्र.२ प्रमाणे नोंद घ्या. आपली जेव्हा अंतीम मंजूरी होईल तेव्हा आकारणी करावी.

मा.आयुक्त साहेब :- अंतीम मंजूरी दिली जाईल. तेव्हा मालमत्ता विभागाला नकाशा व मंजुरीची प्रत दिली पाहिजे. काही भूखंड अंतिम मंजूरी अगोदरच काही प्लॉट विक्री करतात. आणि मग अशा भूखंड धारकांना आपण प्रतिबंध करू शकत नाही.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- अंतीम मंजूरी देण्या आधी त्यानी पैसे भरणे करू शकता. तात्पुरत्या मंजूरीला आपण पैसे भरून घेउ शकत नाही. घरपट्टीमध्ये वाढ केली आहे का. वाढ कशाकशावर केली ते सांगा प्रत्येक नगरसेवकाला वर्षाला किती निधी देता.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पा.नं. ५८ वर ५ कोटी ५२ लाख तरतूद केली आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- प्रत्येक नगरसेवकाला किती निधी आहे व मागील वर्षी किती खर्च केला ते सांगा.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- प्रतिवर्षी रूपये ७ लाख ५६ हजार आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- रूपये ७ लाख ५६ हजार दिली पण बिल निघत नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- अ.क्र.२४ मध्ये थकीत करीता रू.२५ कोटीची तरतूद प्रशासनाने केली आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- इथून पुढे आमच्यासाठी तुम्ही काय करणार.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- ७ लाख ५६ हजार पैकी ४ लाखापर्यतची बिल पहिल्या ६ महिन्यात खर्च होईल.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- तुम्ही आम्हाला निधी कसा उपलब्ध करून देता येईल ते पहा.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- एप्रिलपासून आर्थिक वर्ष धरण्यात आले तर त्यातली दिवाळीपूर्वी ५०% रक्कम व नंतर ५०% रक्कम अदा करू त्याचे अकौंट वेगळे करू.

मा.सौ. छाया तिवारी :- सिध्दर्थनगर भागातील काम लालटाकी रोड झोपडपट्टी गटार त्वरीत दुरूस्त करावी.

प्रक्ल्प अभियंता श्री. मेहेत्रे :- बांधकाम विभागाकडे प्रस्ताव दिला आहे.

मा.सभापती साहेब :- बाकीच महापौर निधी, उपमहापौर निधी ,स्थायी समिती सभापती निधी चे काय.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- १ एप्रिल २०१६ पासून या प्रत्येक निधीच्या कामाचे खाते वेगळे केले जाईल. दर महिन्याला त्याच्यात ठरावीक रक्कम टाकली जाईल जेणेकरून काम अडणर नाही. निधी उपलब्ध होईल.

मा.सभापती साहेब :- महापौर व उपमहापौर निधी मागच्या एवढच ठेवण्यांत यावे. रूपये २ कोटी महापौर निधी व रूपये ५० लाख उपमहापौर निधी व सभापती स्थायी समिती प्रत्येकी.तसेच सभापती महिला व बालकल्याण समिती विकास निधी १५ लाख व उपसभापती महिला व बालकल्याण समिती विकास निधी १० लाख करण्यात यावी.

मा.आयुक्त साहेब :- या प्रत्येक निधीचे स्वतंत्र खाते ओपन करा. ३६५ दिवस उत्पन्नाच स्त्रोत्र चालू असतो. आपण सगळी येणारी रक्कम सर्वसाधारण फंडात जमा करतो. जेव्हा उपक्रम हाती घेतला व ती बिल देण्यासाठी सर्वसाधारण फंडात रक्कम नसते. यासाठी प्रत्येक निधीच्या नावाने खाते ओपन करा.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभापती, महापौर , उपमहापौर , नगरसेवक निधी , सभापती बालकल्याण समिती , उपसभापती बालकल्याण समिती  या सगळया निधी साठी वेगळ खाते ओपन करून त्यात रक्कम टाका.

मा.सभापती साहेब :- आपले जे कर्मचारी आहे. त्यांना वैद्यकीय प्रतीपुर्ती  साठी आपण किती पैसे दिले. त्याऐवजी हेल्थ इन्शुरन्स पॉलीसी उतरवा.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- रूपये २६ लाख ५४ हजार आत्ता पर्यात देण्यात आले आहे.

मा.सभापती साहेब :- या मध्ये  वायरमन ,फायरफायटर चे कर्मचारी  आहेत त्यांच्यासह  सर्वाचा विमा उतरवा.

मुख्यलेखाअधिकारी श्री. विसपुते :- आपण मेडिक्लेम विमा असा बजेट हेड घेतला आहे.

मा.आयुक्त साहेब :- कॅशलेस स्कीमसाठी पॉलीसी उतरवाची

मा.सभापती साहेब :- या वर्षात ही तरतूद व्हायला पाहिजे. असे दीड कोटी रूपये देणे पेडींग आहे. आता आपण कुणाला देतो पुर्ण  फॅमिलीला देतो का ?

मा.आयुक्त साहेब :- ४ किंवा  ५ व्यक्ती कुटुंबाच्या मर्यादेत असतील त्यावर कंपनी निकष लावते.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान नं. ५७ भांडवली खर्च

मा.सभापती साहेब :- रस्ते डांबरीकरण व मजबुतीकरणला किती तरतूद केली.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- रूपये ७ लाख

मा.आयुक्त साहेब :- एवढी कमी तरतूद कशी ठेवली.

मा.सभापती साहेब :- नवीन उदयान विकसीत तरतूद केली मग जुन्या पार्कच काय ?

मा.आयुक्त साहेब :- रस्ता खडीकरण व डांबरीकरण , नुतणीकरण यासाठी तरतूद वाढवण आवश्यक आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- पान नं. ६१ अ.क्र.१४ ला रूपये १ कोटी दाखवले.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान नं.४३, रस्ते दुरूस्ती व देखभाल साठी रूपये ७० लाख

मा.आयुक्त साहेब :- यावर्षी कुठही मुरूम टाकायचे नाही.

मा.सभापती साहेब :- इथून पुढे डांबराच, कॉक्रीट करायच नाही. मुरूम टाकायचा नाही दरवर्षी तुम्ही एकच रोड का पॅचींग  करता. गणपती, माहेरम, शिवजयंती, नवरात्र,  हाचरोड पॅचींग करता दुसरीकडे कुठही पॅचींग करत नाही इथून पुढे मुरूमाच कुठही पॅचींग होणार नाही एकाच ठिकाणी दरवर्षी लाखो रूपये खर्च करतात.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान नं.५८ अ.क्र.१२

मा.आयुक्त साहेब :- कॉक्रीटीकरण रस्ते दुरूस्त करणेसाठी रूपये २० ते २५ लाख शिल्लक ठेवावे.

मा.सभापती साहेब :- खडीकरण साठी ५ ऐवजी १० लाख करावे. पॅचींगला किती ठेवले.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- रूपये ७० लाख

मा.आयुक्त साहेब :- रस्ते दुरूस्ती साठी तरतुद ठेवावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- रस्ते दुरूस्ती हेडऐवजी डांबरीकरण करणे.

मा.आयुक्त साहेब :- पान नं.४३ वर अ.नं.२ रस्ते दुरूस्ती (कॉक्रीटीकरण व डांबरीकरण)

मा.सभापती साहेब :- चारही प्रभागासाठी पैसे व्यवस्थीत दिले गेले पाहिजे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :-७० ऐवज् ८० लाख रूपये करा. प्रत्येक प्रभागाला रूपये २० लाख दया.

मा.आयुक्त साहेब :- रस्ते दुरूस्तीचे ३ प्रकार करा.

१. डांबरी दुरूस्ती - रूपये ५० लाख
२. कॉक्रीटीकरण - रूपये २० लाख
३. खडीकरण - रूपये १० लाख

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान नं.५८ अ.क्र.१८ ते २१ १ते४

मा.सभापती साहेब :- प्रत्येक प्रभाग समिती ला रूपये ४ लाख ठेवले त्याऐवजी रूपये १० लाख ठेवा. बुरूडगाव ऑफिसचा १ मजला वाढवा.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- नवीन इमारती साठी रूपये ३० लाख दाखवले आहेत.(बुरूडगाव क्षेत्रीय कार्यालय विकास करणे)

मा.सभापती साहेब :- या लेखाशिर्षामध्ये रूपये ५० लाख करणे.

मा.आयुक्त साहेब :- शासनाच्या ऑर्डर आता आल्या आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर सुवर्णजयंती महोत्सव अंतर्गत विविध उपक्रम राबवणे रूपये १० लाख तरतूद करा.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान नं. ६० अ.क्र. ५०

मा.आयुक्त साहेब :- कै.बा.दे. दवा. या दवाखान्यातून किती उत्पन्न मिळत हे बघायच नाही तो अत्यावश्यक सेवेत येतो.

मा.सभापती साहेब :- केडगाव, बुरूडगाव उदयान विकसीत करणे करीता प्रत्येकी २५ लाख अशी एकुणे ५० लाखची तरतूद करण्यात यावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- गोयल मागच्या तीन वर्षापासून बजेटमधे तरतूद आहे. पण गार्डन विकसित होत नाही.

उदयान प्रमुख श्री. गोयल :- नगरोत्थानच्या कामात महालक्ष्मी उदयान चा बोर्ड पडला आहे.

श्री. पारखे :- महालक्ष्मी उदयानचा बोर्ड लाईटच्या कामात पडला आहे.

मा.श्री. अनिल बोरूडे :- बालिकाश्रम रोड येथील स्पीड ब्रेकरच काय झाले.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- बुरूडगाव व केडगाव येथे उदयान विकसीत करणे बाबत प्रस्ताव केला आहे का ? सभापती म्हणतात की तरतूद ठेवता पण उदयान विकसीत करत नाही.

मा.सभापती साहेब :- शाहू महाराज व्यायाम शाळा दुरूस्ती करता येईल का.

श्री. निंबाळकर :- त्या बिल्डींगच मुळ स्ट्रक्चर चांगले आहे. पण बाकी सगळे रिन्युएशन करावे लागेल. ४०ते४५ लाख रूपये खर्च करावा लागेल.

मा.उपायुक्त (सा.)श्री. चारठाणकर :- बुरूडगांव व केडगांव गार्डन विकसीत करणेसाठी ३० लाख तरतुद आहे.

मा.सभापती साहेब :-३० लाख ऐवजी ५० लाख करा.नेहरू मार्केट टेंडर ४ ते ५ दिवसांत निघालेच पाहिजे.पिंपळगांव माळवी येथील मनपाची जागा आहे.तिथे बी.ओ.टी.तत्वावर पर्यटन केंद्र विकसीत करणे,पार्क करणे रिसॉर्ट टाईप होईल पिंपळगांव ७०० एकर जागा बी.ओ.टी.तत्वावर देणेत यावी.

मा.आयुक्त :- बहूउपयोगी बी.ओ.टी.तत्वावर देणे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- मेहेत्रे साहेब इतर महानगरपालिका मध्ये बी.ओ.टी. तत्वावर काही प्रकल्प विकसीत केले असतील तर त्या बाबत माहिती घेवून कार्यवाही करणे.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान.नं.५९ अ.क्र.४२,अ.नं.४४ पान नं.६० वर अ.नं.४७ अ.क्र.४९ अ.क्र.४६ पान नं.६० सी.सी.टि.व्हि.१० लाख तरतुद

मा.सभापती साहेब :- आहिल्यादेवी होळकर स्मारक, भिस्तबाग चौक सुशोभीकरण करणेकरीता तरतूद वाढवावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- नगर शहराला टूरीझम सिटी म्हणून विकसीत करणे कामी ५० लाख तरतूद केली.पर्यटन संबंधी बोर्ड लावणे जातील.महावीर कलादालन जवळ जागा पाहतो आहे.मॉडेल रोड म्हणून रस्ता विकसीत करावा.बोर्ड,स्पीड ब्रकर्स ,डिव्हायडर,वृक्षरोपण असा एक रस्ता विकसीत करावा.

मा.सभापती साहेब :- ४रस्ते निवडा.चिठठी काढून जो रस्ता येईल तो घ्या फेज २ च काय ? आयुक्त साहेब

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- निकम साहेब तुम्ही म्हणता पाईप आले त्याचे काय

मा.सभापती साहेब :- श्री. निकम ,मॅके.इंजि. आम्हाला रोड करायचे आहे.

मॅके.इंजि. श्री. निकम :- ३ वर्षाची मुदत होती. त्याच्यावर कार्यवाहीचा प्रस्ताव महासभेपुढे दिला आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- तो काम करत नाही. मग तुम्ही काय करणार.

मा.सभापती साहेब :- आयुक्त साहेब आम्ही तुम्हाला लेखी देतो. कधी काम करणार रोड मंजूर आहे. परत तुम्ही लाईन टाकणार लोक कनेक्शन घेणार.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान नं.६ १ अ.क्र.३३ मनपा इमारती व अमरधाम मध्ये सोलर प्रकल्प राबवणे

प्रकल्प अभियंता श्री. मेहेत्रे :- पान नं.६४ सि.नं.१५

मा.आयुक्त साहेब :- घनकचरा अनुदान रूपये १ कोटी आहेत ते ५ कोटी तरतूद करा.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान नं.६४ अ.क्र. १७ व १८ साठी

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- मनपा विरूध्द सिनानदी प्रदुशणाच्या बाबत एन.जी.टी.कडे केस चालू आहे. भुयारी गटार योजनेचे अंदाजपत्रकानुसार ३१५ कोटी ची योजनाअमृत योजनेखाली समावेश केलेली आहे.आपल्याला रूपये ३ कोटी जमा करावे लागतील १०% अनुदान आपल्याला भरावे लागणार आहे. राज्य नदी संवर्धन ऐवजी सिनानदीमध्ये सांडपाणी प्रकल्प उभारणे त्यासाठी ६५ पानावर अ.क्र. ५ पान नं. ६७ अ.क्र.५ ला घेणे.

मा.आयुक्त साहेब :- जो मैला गोळा करण्या करता जो अभिकर्ता नेमला आहे. त्यामार्फत तो गोळा करून मोकळा जागेवर, नदी नाले तिथे टाकला जातो.मैला प्रक्रिया करणे व पाण्याचा पुर्नवापर करणे ३ मेट्रीक टन, ५ मेट्रीक टन मैला मलीनस्सारण प्रकल्प उभार करता येईल. व आपण पहिल्या वर्षी ३ मेट्रीक टन निस्सारण प्रकल्प हाती घेवू .या मलनिस्सारण योजनेसाठी तरतूद करावी लागणार आहे.

अर्थ विभाग श्री. लोंढे :- पान नं. ६७ भाग-२

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- आपत्कालीन व्यवस्थापन बांधकाम विभागासाठी वेगळ आहे.

मा.आयुक्त साहेब :- मुख्य शिर्ष जलीनस्सारण, पाईप लाईन बदलणे, सांडपाणी, गटार नाले, इ. दुरूस्त करणे हे आत्पकालीन अंतर्गत येते.

मॅके.इंजि. श्री. निकम :- लालटाकी व समर्थनगर येथील पाण्याच्या टाक्या बांधल्या आहेत. पान नं. ६९ , अ.क्र.१७ पिंपळगाव माळवी तलाव पुर्नजिवीत करणे तरतूद रूपये ५० लाख तरतूद रदद करणे

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :-पाणीपुरवठा एकूण बजेट रूपये १८८ कोटी झाले.

मा.सभापती साहेब :- मी दरवर्षी सांगतो. वृक्षगणना करा. किती वर्षापुर्वी गणना झाली आहे.

उदयान प्रमुख श्री. गोयल :- १९९५ साली झाली आहे. दर १० वर्षानी झाली पाहिजे. वृक्षगणना जी केली जाते वेबसाईटवर गणना केली जाते त्याला रूपये २० लाखाच्यावर खर्च येतो.

मा.सभापती साहेब :- झोन वाईज गणना करा. यावर्षी वृक्षगणना झालीच पाहिजे. २० वर्ष झाले तुम्ही वृक्षगणना केली नाही. यावर्षी गणना करून घ्या झाड लावण्यासाठी किती तरतूद केली.

मुख्यलेखाअधिकारी श्री. विसपुते :- पान नं.४२ ,अ.क्र. ७ वर वृक्षगणनेसाठी रू.२४ लाख तरतूद केली. पान नं.४२ अ.क्र.३ वर झाड लावणेसाठी रू. २२ लाख तरतूद आहे.

मा.सभापती साहेब :- ७,८,१० फुटाचे झाड लावले पाहिजे. पुढच्या वेळेला तुम्हाला विचारणा होईल. झाड लावणे , वृक्षगणना मी ३ वर्षापुर्वी म्हटले होते. झाडे लावली पाहिजे वृक्षगणना करायला पाहिजे.

मा.आयुक्त साहेब :- १. मनपामार्फत वृक्ष जोपासनेसाठी ट्री ॲडॉप्शन प्रकल्प राबवणे

२. मनपाने जागा पाहून किती झाडे लावता येईल ती संख्या निश्चित करून ८ ते १० फुटी झाडे लावणे त्याला पाणी देणे व झाडांवर लक्ष देणे.प्रमुख्याने बाबीं विचारात घेतल्या पाहीजे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम **:-** अंदाजपत्रकीय सभेत झालेली चर्चा तसेच प्रस्तावातील दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

मा.सौ.छाया तिवारी **:-** अंदाजपत्रकीय सभेत झालेली चर्चा तसेच प्रस्तावातील दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्त साहेब यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सभेमध्ये चर्चा करून शिफारशी केल्या असुन त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये दुरूस्त्या, फेरफार व शिफारशीसह सन २०१५-२०१६ सालचे सुधारित सन २०१६-२०१७ सालचे बाबवार अंदाजपत्रक मनपाचे स्कुल बोर्डाचे शेअर्ससह महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सर्व मा.स्थायीसमिती सदस्य,अधिकारी,कर्मचारी यांनी सभा पार पाडणेकामी केलेल्या सहाकार्याबद्दल सर्वांचे आभार मानतो.आजची मा.स्थायी समिती बजेटवरील बैठक संपल्याचे जाहिर करतो.

**ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५ व ९६नुसारअहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७चे मुळ अंदाजपत्रक (कर,दर प्रस्तावासह) व त्या सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर पाहिले. ते पुढील प्रमाणे.

प्रस्ताव क्र. १ :- पाणी पुरवठा विभाग - पाणीपट्टीचे दरात वाढ करणेबाबत.

प्रस्ताव क्र. २:- अग्निशमन विभाग - अग्निशमन कर लावणबाबत.

प्रस्ताव क्र. ३ :- आरोग्य विभाग - फिरता दवाखाना आरोग्य सुविधा नि:शुल्क करणेबाबत.

प्रस्ताव क्र. ४:- आरोग्य विभाग - मनपा सर्व दवाखाने,नागरी आरोग्य केंद्रा बाबत.

प्रस्ताव क्र. ५:- आरोग्य विभाग - अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठ पिढीत, कुष्ठ पिढीत अपंग रूग्ण व मनोरूग्ण (वेडे ) यांना अर्थसहाय्य देणे बाबत.

**वरील प्रस्तावावर झालेल्या चर्चे नुसार**

**प्रस्ताव क्र.१.:-**घरगुती वापर ची पाणीपट्टी दरा मध्ये वाढ न करता इतर कारणांसाठीची व्यावसायीक , औदयोगीक, ,टॅकर ने पाणीपुरवठा करणे या प्रस्तावीत वाढीव दरास ही सभा मान्यता देत आहे.

**प्रस्ताव क्र.२ :-** अग्निशमन कर २%लागू करण्याचा प्रस्ताव ना मंजूर करण्यात येत आहे.

**प्रस्ताव क्र.३:-** फिरत्या दवाखान्यामार्फत पुरविण्यात येणा-या आरोग्य सुविधा नि:शुल्क करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

**प्रस्ताव क्र.४:-** आरोग्य विभाग - मनपा सर्व दवाखाने,नागरी आरोग्य केंद्रा बाबत.ऑफिस रिपोर्ट नुसार रूग्णांच्या अत्यल्प प्रतिसाद असलेले शहरी भागातील काही दवाखाने कायम स्वरूपी बंद करणे आणि हद्द वाढीतील उपनगरांसाठी नवीन दवाखाने सूरू करणे आणि त्या अनुशंगाने जागा म.न.पा.स्वमालकीची किंवा भाडेतत्वावर उपलब्ध करणे,कर्मचारी व त्या अनुशंगाने इतर आवश्यक बाबी इत्यादीची तरतुद सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पात महिला व बालकल्याण समिती लेखाशिर्षाकामध्ये करण्याबाबत च्या प्रस्तावानुसार अत्यल्प प्रतिसाद असलेले शहरी भागातील काही दवाखाने कायम स्वरूपी बंद करणे आणि हद्द वाढीतील उपनगरांसाठी नवीन दवाखाने सूरू करणेस ही सभा समान्यता देत आहे. तथापी त्या अनुशंगाने जागा म.न.पा.स्वमालकीची किंवा भाडेतत्वावर

उपलब्ध करणे,कर्मचारी व त्या अनुशंगाने इतर आवश्यक बाबी इत्यादीचा खर्च महिला व बालकल्याण समिती लेखाशिर्षा मध्ये दर्शविण्यात येउ नये. याकामी पुर्वी वापरण्यात येणारे लेखाशिर्षच वापरण्यात यावे.

**प्रस्ताव क्र. ५ :-** आरोग्य विभाग - अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठ पिढीत,कुष्ठ पिढीत अपंग रूग्ण व मनोरूग्ण (वेडे ) यांना प्रति रुग्ण, प्रति महिना रक्कम रु.१,०००/- अर्थसहाय्य देणे बाबत चा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. त्या करीता रक्कम रूपये १०लाख तरतुद करण्यात यावी.

अ.नगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ सालचे सुधारित व सन २०१६-२०१७ सालचे म.न.पा. शिक्षण विभागाच्या शेअरसह मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करित आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ सालचे सुधारित व सन २०१६-२०१७ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे. (**सोबत**-सन २०१५-२०१६ च्या सुधारीत व सन २०१६-२०१७ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता)

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगतामध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस ही सभा शिफारस करित आहे.

**तसेच**

* शहरातील हॉस्पीटल,हॉटेल्स तसेच वर्दळीची सार्वजनीक ठिकाणे येथे ज्या ठिकाणी मोठयाप्रमाणात दु चाकी व चार चाकी वाहनांचे पार्किग केले जाते. त्या जागा निश्चित करून विहीत पध्दतीने भाडे तत्वावर देवून पार्किग व्दारे मिळणारे उत्पन्न वाढविण्यात यावे. पे ॲण्ड पार्क पासून मिळणारे उत्पन्न रूपये ९.९५ लाख इतकी तरतूद वाढविण्यात यावी.

*नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून तसेच जी.आय.एस.च्या माध्यमातून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टी जी.आय.एस.प्रणाली व्दारे शहराचे सर्व्हेक्षण चे काम ५० % पुर्ण झाले असून या सर्व्हेक्षणातुन १० हजार नविन प्रॉपर्टी सापडल्या आहेत. सर्व्हेक्षणाचे काम पुर्ण झाल्या नंतर यामध्ये अंदाजे १० हजार प्रॉपर्टी नव्याने भर पडेल.एकुण २० हजार प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून घरपट्टी उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होईल.सर्वसाधारण कराच्या लेखाशिर्षामध्ये १५टक्के वाढ करण्यात यावी.

* नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिग ॲाक्ट अंतर्गत फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. लेखाशिर्षामध्ये रु.१ लाखाने तरतुदीमध्ये वाढ दर्शविण्यांत यावी.

* गाळे धारकांकडून थकित असलेली सर्व भाडे रक्कम त्वरीत वसूल करण्यात यावी. या लेखाशिर्ष मध्ये रू.३० लाख वाढ करण्यात यावी.

* अनाधिकृत हस्तांतरण व गाळयांच्या अंतर्गत बदल केलेल्या गाळे धारकांकडून त्या पोटी फि वसूल करण्यात यावी. यामुळे या लेखाशिर्ष मध्ये रू.२० लाख वाढ करण्यात यावी.

*अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे या लेखाशिर्षकामध्ये रू.५० लक्षांनी वाढ करण्यात यावी.

*जाहीरात बोर्ड जागा भाडे ही बाब उत्पन्नाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असुन या विभागाकरीता कर्मचारी वर्ग वाढविण्यांत येवून संपुर्ण शहराचा सर्व्हे करुन वसुली केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. शहराचा वाढता विस्तार व व्यवसाय लक्षात घेता या माध्यमातुन सुमारे रू.५०लाख रुपये वाढ करण्यात यावी.

* शहरातील मालमत्ता खरेदी -विक्री झाल्यावर त्यांची नोंदणी महानगरपालिके कडे करण्यात येत नाही.त्या मुळे नांव नोंदणी शुल्क हा महसूल मोठया प्रमाणात बुडतो.,अशी प्रकरणे शोधून त्या मालमत्तेवर नांव लावण्याची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत त्या मुळे नांव नोंदणी मध्ये नव्याने दाखल होणा-या प्रकरणांचा ओघ पहाता तरतुद उत्पन्नात रु.५० लाख वाढ करावी.

*अहमदनगर शहरामध्ये नव्यावे गॅन्ट्रीज उभारण्यात येणार आहेत.तसेच महानगरपालिकेने तत्सम उपक्रम घेतल्यास रॉयल्टीचे उत्पन्न मिळणार आहे.गॅन्ट्रीज रॉयल्टी या नावाने लेखाशिर्ष नव्याने तयार करून या मध्ये तरतुद रू.२५ लक्ष करण्यात यावी.

*महानगरपालिका शाळा भाडे पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने थकबाकी वसूली व अन्य उपाययोजना कराव्यात रू.२५लाखाने उत्पन्नात वाढ दर्शविण्यात यावी.

*महानगरपालिकेस असणा-या सुट्टीच्या दिवशी किंवा विनापरवाना शहरामध्ये ब-याच ठिकाणी रस्ते फोडणे, ड्रेनेज व पिण्याच्या पाण्याची लाईन जोडणे असे प्रकार घडल्याचे निदर्शनास येत आहे याकरीता सदर बाबत बारकाईने लक्ष देवुन अशा प्रकारच्या कामाची फी वसुल केल्यास निश्चितच उत्पन्नात भर पडेल. यादृष्टीने उपाय योजना करण्यांत यावी. यामध्ये रू.३० लाख रुपयांनी तरतुदीमध्ये वाढ दर्शविण्यांत यावी.

खर्च

*मा.शासनाकडुन सिटी सर्व्हेचे काम मोफत होणेच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यांत यावा तसेच याकामी महानगरपालिकेस खर्च करण्याच्या दृष्टीने रक्कम रु.३ लाख तरतुद ठेवण्यांत यावी.

*महानगरपालिकेच्या विविध सत्कार समारंभप्रसंगी गार्डन विभागा कडून खरेदी करीता हार,बुके,गुच्छ खरेदी करीता सन २०१५-१६ मध्ये तरतुद रूपये ३ लक्ष २० हजार ऐवजी सूधारून रूपये ५लाख ५० हजार एवढी करण्यात यावी. या लेखाशिर्षात सन २०१६-१७ करीता रूपये ५ लाख ५०हजार इतकी तरतुद करण्यात यावी.

* रस्ते दुरूस्ती (पॅचिंग व मुरूम टाकणे ) हे लेखाशिर्षा चे नांव बदलून त्या ऐवजी रस्ते दूरूस्ती- १. डांबरीकरण २. सिमेंट कॉक्रीटीकरण ३. खडी करण असे लेखाशिर्ष करणे.या लेखाशिर्षात सन २०१६-१७ करीता रूपये ८० लाख इतकी तरतुद करण्यात यावी.ही तरतूद ४ प्रभाग समिती कार्यालयांकरीता प्रत्येकी २० लाख इतकी निर्धारीत करून दयावी.या ८० लाख तरतूदी पैकी रूपये ५० लाख रूपये डांबरीकरण, रू.२० लाख सिमेंट कॉक्रीटीकरण,रू.१० लाख खडी करण करणे अशी विभागणी उपलेखाशिर्ष करून कारण्यात यावी.

* नविन रस्ते अ - रस्ते खडीकरण, या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१६-१७ वर्षा करीता तरतूद रू.५ लाख ऐवजी १० लाख करण्यात यावी.

*नविन रस्ते ब - रस्ते डांबरीकरण व नुतनी करण या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१६-१७ वर्षा करीता तरतूद रू.७ लाख ऐवजी रू.१० लाख करण्यात यावी.

*नविन इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत तरतूद रू.२० लाखाने वाढवून रू.५० लाख करण्यात यावी.आणि बुरूडगांव क्षेत्रीय कार्यलय हे नविन इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत असलेल्या तरतूदी मधून विकसीत करण्यात यावे.

*प्रत्येक प्रभाग समिती ला रूपये ४ लाख ठेवले त्याऐवजी रूपये १० लाख तरतूद ठेवा.

*अहमदनगर महानगरपालिकेचे पदाधिकारी यांचेकडे नागरी सुविधेची मागणी करणेकामी नागरीकांचे शिष्टमंडळे येतात. तसेच इतरही मा.सदस्य सुचना करतात या सर्व बाबींचा विचार करुन पुढील प्रमाणे लेखाशिर्ष निहाय तरतुदी करण्यांस ही सभा शिफारस करीत आहे. महापौर शहर विकास निधी रू.२ कोटी उपमहापौर शहर विकास निधी रु.५० लाख व स्थायी समिती सभापती शहर विकास निधीमध्ये ५० लाख रुपयांची तरतुद करण्यांत यावी. तसेच सभापती महिला व बालकल्याण समिती, विकास निधी १५ लाख, उपसभापती महिला व बाल कल्याण विकास निधी १० लाख इतकी तरतुद करण्यांत यावी. या निधी करीता प्रत्यक्ष रक्कम उपलब्ध व्हावी या करीता प्रत्येक निधी चे स्वतंत्र्य बॅक खाते उघडून दर आठवडयाला त्यामध्ये ठराविक रक्कम वर्ग करण्यात यावी.

*वॉर्ड विकास निधीमध्ये रक्कम रु.१ कोटी ८५ लाखाची तरतुद करावी.

* प्रभाग क्र.३० बुरूडगांव रोड श्रीराम नगर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे २० लाखाची तरतूद करण्यास ही सभा शिफारस करीता आहे.स्वतंत्र लेखाशिर्षक तयार करण्यात यावे.

*भांडवली खर्च अ - अंदाजपत्रक मध्ये २६ अ असे नविन लेखाशिर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुवर्ण जयंती शतकोत्तर महोत्सव विविध उपक्रम राबविणे या नावाचे तयार करण्यात यावे व सन २०१६-१७ करीता त्या मध्ये रू.१० लाख इतकी तरतूद करण्यात यावी.

* महात्मा ज्योतीबा फुले पुर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणे या लेखाशिर्षामध्ये सन२०१६-१७ करीता रू.१० लाख इतकी तरतूद करण्यात यावी.

* कै.बा.दे.दवाखाना नुतनीकरण करणे या लेखाशिर्षा मध्ये सन २०१६-१७ रू.१० लाख इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

* बुरूडगांव रोड व केडगांव या उपनगरामध्ये उद्यान विकसीत करणे (प्रत्येकी रू.२५ लाख) या लेखाशिर्षा मध्ये सन २०१६-१७ करीता तरतूद रू.५० लाख इतकी दर्शविण्यात यावी.

* पिंपळगांव माळवी येथील अहमदनगर महानगरपालिकेच्या जागेमध्ये बी.ओ.टी. तत्वावर पर्यटन केंद्र विकसीत करण्यात यावे.या बाबत आवश्यक ती कार्यवाही प्रकल्प विभाग प्रमुख यांनी करावी.

*अहमदनगर शहरातील गणपती मिरवणूक मार्ग,मोहरम मिरवणूक मार्ग व प्रमुख चौक येथे मा.जिल्हा पोलिस प्रमुख यांचे पत्रा नुसार सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्यात यावेत.या करीता प्रमुख चौकात सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविणे या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ या वर्षा करीता रू.१० लाख इतकी तरतूद करण्यात यावी.

*अध्यक्ष शिववरद प्रतिष्ठाण,रंगारगल्ली, अहमदनगर यांनी शहर वासीयांसाठी सांस्कृतीक महोत्सव भरविणे कामी स्थायी समितीस रूपये १लाख ५० हजार इतक्या अर्थसहाय्याची मागणी केली आहे.तरी सदर संस्थेस निधी उपलब्ध करून देण्यास ही सभा मान्यता देत आहे.सामाजीक संस्थांना देणगी या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१लाख ५० हजार इतकी वाढ करण्यात यावी.

* बुरूडगांव रोड भागातील माडगे मळा अंतर्गत ड्रेनेज लाईन व अंतर्गत रस्ते मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे रू.२५ लाखाची तरतूद करण्यास ही सभा शिफारस करीता आहे.स्वतंत्र लेखाशिर्षक तयार करण्यात यावे.

*पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर स्मारक भिस्तबाग परिसरात उभारणे/ चौक सुशोभिकरण या लेखाशिर्षावर रू.१० लाख इतकी तरतूद सन २०१६-१७ या वर्षा करीता दर्शविण्यात यावी.

*मॉडेल रस्ता विकसीत करणे या लेखाशिर्षा अंतर्गत कार्यावाही करतांना अहमदनगर महानगरपालिकेच्या ४ प्रभाग समिती कार्यालया अंतर्गत येणा-या भागातील संभाव्य रस्ते निवडून त्या पैकी एका रस्त्याची निवड चिठ्ठी काढून करण्यात यावी.

*क्र.५४ शासकीय अनुदाने मधील १२ वा/१३वा/१४वा वित्त आयोग या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ या वर्षा करीता तरतूद रू.२० कोटी दर्शविण्यात यावी.

*अमृत योजना  - सोलरप्रकल्प उभारणे म.न.पा.हिस्सा / कर्ज या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च करतांना महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत व अमरधाम येथे सोलर प्रकल्प राबवावेत.

* प्रकल्प विभाग अ.नं.१७ घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट अनुदान या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ करीता रू.२.५० कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

* प्रकल्प विभाग अ.नं.१८ घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट म.न.पा हिस्सा या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ करीता रू.२.५०कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

* सिनानदी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे कामी खर्च अमृत योजना या लेखाशिर्षा वर -शहर भुयारी गटर योजना मनपा हिस्सा अंतर्गत सन २०१५-१६ करीता रू.३ कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

*प्रकल्प विभाग अ.नं.१९ ब  हे नविन लेखाशिर्ष मैला,मलनिःस्सारण प्रक्रिया प्रकल्प उभारणे या नावाने तयार करून त्यावर सन २०१६-१७ या वर्षा करीता रू.५ कोटी इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

*आरोग्य विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार नाविन्यपुर्ण योजना अनुदान (रक्त विघटन प्रयोग शाळा कार्यान्वत करणे ) हे नविन लेखाशिर्ष तयार करून सन २०१५-१६ करीता रू.७५ लाख व सन २०१६-१७ करीता रू.७५ लाख इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

*आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (ड्रेनेज,गटर,रस्ते,इ.)या लेखाशिर्षात दुरूस्ती करून रस्ते या शब्दाऐवजी - नाल्या,पाणी पाईपलाईन दुरूस्ती - असे नांव कारण्यात यावे आणी  लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद रूपये १  कोटी दर्शविण्यात यावी.

* भांडवली खर्च "क" अंदाजपत्रक मधील जलनिःस्सरण  विभाग क्र.८ अ वर कायम (बांधकाम ) हे दर्शवून त्यामध्ये सन २०१६-१७ रू.१० लक्ष इतकी तरतूद दर्शविण्यात यावी.

*अग्निशमन विभागा करीता प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग मिळावा या करीता ठेका पध्दतीने फायरसब ऑफीसर,फायरमन व वाहन चालक न घेता मानधनावर विहीत पध्दतीने नियुक्ती करून कर्मचारी घेण्यात यावेत या करीता ब- सार्वजनिक सुरक्षीतता अग्निशमन विभाग मधील क्र.१२ चे लेखाशिर्षा मध्ये ठेका या शब्दा ऐवजी मानधन हा शब्द वापरून मानधन पध्दतीने फायर सब ऑफीसर फायरमन, वाहन चालक असे लेखाशिर्ष करण्यात यावे.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह  सन २०१६-२०१७ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या म.न.पा.  शिक्षण विभागाच्या शेअरसह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी  करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम  सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी  सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

(गणेश पुंडलिक भोसले)
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर.**

**मा. स्थायी समितीने मंजूर केलेला सन २०१५-२०१६चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)**

| | |
|---|---|
| **सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१५)........................................** | **१२३२.६४** |
| **एकुण जमा...................................................................** | **४१७३८.७७** |
| **सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा.............................................** | **४२९७१.४१** |
| **एकुण खर्च...................................................................** | **४२१०७.८६** |
| **अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१६)..................................** | **८६३.५५** |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू)सन १५-१६** | मा. आयुक्त यांनी सुचविलेली केलेली तरतुद | मा. स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (ब्लड बॅक ) | ०.०० | ७५.०० | -- | ७५.०० |
| २ | रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत/नव्याने करणे | ०.०० | १३२.०० | -- | १३२.०० |
| ३ | अमृत योजना - शहर भुयारी गटर योजना मनपा हिस्सा/ कर्ज | ०.०० | ३००.०० | -- | ३००.०० |
| | | ०.०० | ५०७.०० | ०.०० | ५०७.०० |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन १५-१६** | मा.आयुक्त यांनी सुचविलेली केलेली तरतूद | मा. स्थायी सभेने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अमृत योजना - शहर भुयारी गटर योजना मनपा हिस्सा/ कर्ज | ०.०० | ३००.०० | -- | ३००.०० |
| २ | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (ब्लड बॅक ) | ०.०० | ७५.०० | -- | ७५.०० |
| ३ | रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत/नव्याने करणे | ०.०० | १३२.०० | -- | १३२.०० |
| ४ | गुच्छ,हार,फुले,खरेदी | ३.५० | २.०० | -- | ५.५० |
| ५ | नविन इमारती | १.०० | १.०० | -- | २.०० |
| ६ | प्रभाग समिती क्र.१ | ४.०० | १.०० | -- | ५.०० |
| ७ | प्रभाग समिती क्र.२ | ४.०० | १.०० | -- | ५.०० |
| ८ | प्रभाग समिती क्र.३ | ४.०० | १.०० | -- | ५.०० |
| ९ | प्रभाग समिती क्र.४ | ४.०० | १.०० | -- | ५.०० |
| | | २०.५० | ५१४.०० | ०.०० | ५३४.५० |

सही/-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर.

### मा. स्थायी सभेने मंजूर केलेला सन २०१६-२०१७चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१६)........................................८६३.५५**

**एकुण जमा..................................................................७४४६५.४३**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................७५३२८.९८**

**एकुण खर्च..................................................................७४७३८.३५**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१७)................................ ५९०.६३**

| अ.नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू) सन १६-१७** | मा.आयुक्त यांनी सुचविलेली केलेली तरतूद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ६०००.०० | ९००.०० | | ६९००.०० |
| २ | अग्नीशमन कर | १०.०० | | १०.०० | ०० |
| ३ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | ३२५०.०० | | ७५०.०० | २५००.०० |
| ४ | पे आणि पार्कपासून उत्पन्न | ०.०५ | ९.९५ | | १०.०० |
| ५ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईचे उत्पन्न | १५५.०० | १००.०० | | २५५.०० |
| ६ | १२वा/१३वा/१४वा वित्त आयोग निधी | १०००.०० | १०००.०० | | २०००.०० |
| ७ | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (ब्लड बॅक) | ०.०० | ७५.०० | | ७५.०० |
| ८ | रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत/नव्याने करणे | ०.०० | १३२.०० | | १३२.०० |
| ९ | घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट अनुदान | १००.०० | १५०.०० | | २५०.०० |
| १० | अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | २५०.०० | ५०.०० | | ३००.०० |
| ११ | रस्ता कर | ३६४.४३ | ७.०० | | ३७१.४३ |
| १२ | घनकचरा व्यवस्थापन- सेवाकर | ११६२.९४ | २४.०० | | ११८६.९४ |
| १३ | ड्रेनेज कर | ३२३.०० | १४.०० | | ३३७.०० |
| १४ | मललाभ कर | ७७.०० | ७.०० | | ८४.०० |
| १५ | जललाभ कर | ७७.०० | ७.०० | | ८४.०० |
| १६ | मुंबई नर्सिग होम ॲक्ट फी | १०.०० | १.०० | | ११.०० |
| १७ | गाळा भाडे | १६७.२० | ३०.०० | | १९७.२० |
| १८ | गाळे हस्तांतरण फी | ६५.०० | २०.०० | | ८५.०० |
| १९ | जाहिरात बोर्ड जमा भाडे | ८.२५ | ५०.०० | | ५८.२५ |
| २० | गॅन्ट्रीज रॉयल्टी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| २१ | मनपा शाळे भाडेपासून उत्पन्न | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |
| २२ | विनापरवाना रस्ते,ड्रेनेज व पाण्याची लाईन फोडणे फी | ०.०० | ३०.०० | | ३०.०० |
| २३ | मालमत्ता नांव नोंदणी फी | ४००.०० | ५०.०० | | ४५०.०० |
| | | १३४६९.८७ | २७०६.९५ | ७६०.०० | १५४१६.८२ |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू)<br>सन १६-१७** | मा.आयुक्त यांनी सुचविलेली केलेली तरतूद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | रस्ते दुरूस्ती (डांबरीकरण ५० लाख, सिमेंट रस्ते २०लाख,खडीचे रस्ते १० लाख) | ७०.०० | १०.०० | -- | ८०.०० |
| २ | पुल बांधेणे व दुरूस्ती | ३.७५ | १७१.२५ | | १७५.०० |
| ३ | रस्ते खडीकरण | ५.०० | ५.०० | -- | १०.०० |
| ४ | रस्ते खडीकरण व नुतनीकरण | ७.०० | ३.०० | | १०.०० |
| ५ | नविन इमारती | ३०.०० | २०.०० | -- | ५०.०० |
| ६ | प्रभाग समिती क्र.१ | ४.०० | ६.०० | -- | १०.०० |
| ७ | प्रभाग समिती क्र.२ | ४.०० | ६.०० | -- | १०.०० |
| ८ | प्रभाग समिती क्र.३ | ४.०० | ६.०० | -- | १०.०० |
| ९ | प्रभाग समिती क्र.४ | ४.०० | ६.०० | -- | १०.०० |
| १० | महापौर शहर विकास निधी | ०.०० | २००.०० | | २००.०० |
| ११ | उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १२ | सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | -- | ५०.०० |
| १३ | सभापती,महिला व बाल कल्याण समिती शहर विकास निधी | ०.०० | १५.०० | -- | १५.०० |
| १४ | उपसभापती,महिला व बाल कल्याण समिती शहर विकास निधी | ०.०० | १०.०० | -- | १०.०० |
| १५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष निमित्त उपक्रम राबविणे | ०.०० | १०.०० | -- | १०.०० |
| १६ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणे | ०.०१ | ९.९९ | -- | १०.०० |
| १७ | महात्मा ज्योतिबा फुले पुर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणे | ०.०१ | ९.९९ | -- | १०.०० |
| १८ | कै.बा.दे.दवाखाना नुतनीकरण करणे | ०.०१ | ९.९९ | -- | १०.०० |
| १९ | बुरूडगांव रोड व केडगांव या उपनगरामध्ये उद्यान विकसीत करणे (प्रत्येकी २५ लक्ष रूपये) | ३०.०० | २०.०० | -- | ५०.०० |
| २० | सारसनगर,बोल्हेगांव परिसर,कॉटेज कॉर्नरजवळ,मुकंदनगर(प्रत्येकी १२.५० लाख) व कल्याण रोड येथील नालेगांव स.नं.३३/१,३४ येथे (२० लाख)नालेगांव स.नं.५/२ संभाजीनगर येथे (१० लाख) उद्यान विकसीत करणे. | ६०.०० | २०.०० | -- | ८०.०० |
| २१ | प्रमुख चौकात सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविणे | ०.०० | १०.०० | -- | १०.०० |
| २२ | पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर स्मारक भिस्तबाग परिसर करणे. | १.०० | ९.०० | -- | १०.०० |
| २३ | १२वा/१३वा/१४वा वित्त आयोग निधी | १०००.०० | १०००.०० | -- | २०००.०० |
| २४ | घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट अनुदान | १००.०० | १५०.०० | -- | २५०.०० |
| २५ | घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट मनपा हिस्सा | १००.०० | १५०.०० | -- | २५०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २६ | नाविन्यपूर्ण योजना अनुदान (ब्लड बॅक) | ०.०० | ७५.०० | -- | ७५.०० |
| २७ | मलनि:स्सारण केंद्र उभारणे | ०.०० | २००.०० | | २००.०० |
| २८ | आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (नाल्या,पाईप लाईन दुरूस्ती,इ.) | १०.०० | ९०.०० | | १००.०० |
| २९ | रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत /नव्याने करणे | ४०.०० | ९२.०० | | १३२.०० |
| ३० | वेडयांचा,कुष्ठरोगी यांचा पोषणाचा खर्च | १.०० | ९.०० | | १०.०० |
| ३१ | थकीत देयके अदा करणे | २५५०.०० | | ४५०.०० | २१००.०० |
| ३२ | सिटी सर्व्हे - सावेडी गावठाण | ३०.०० | | २७.०० | ३.०० |
| ३३ | वॉर्ड विकास निधी | ०.०० | १८३.०० | | १८३.०० |
| ३४ | सामाजिक संस्थांना देणगी | ४.०० | १.५० | | ५.५० |
| ३५ | आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (बांधकाम) | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| ३६ | प्र.क्र.३० बुरूडगांव रोड श्रीरामनगर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे | ०.०० | २०.०० | | २०.०० |
| ३७ | बुरूडगांव रोड माडगे मळा अंतर्गत ड्रेनेज लाईन व रस्ते मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| ३६ | गुच्छ,हार,फुले खरेदी | ३.५० | २.०० | | ५.५० |
| | | ४०६१.२८ | २६६४.७२ | ४७७.०० | ६२४९.०० |

सही/-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.